महाराष्ट्र शासन

तात्काळ

क्रमांक: पीईसी १६८४/२०१०/[२४४]/तांशि-१ [अ],
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक :- ३ जुलै १९८४

प्रति,

अध्यक्ष,
श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस,
१०६१ अ, शिवाजी पेठ, कोल्हापूर-२.

विषय :- अशासकीय संस्थांना विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता .............

महोदय,

अभियांत्रिकी/तंत्रशास्त्रामध्ये पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासंबंधीच्या आपल्या अर्जासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, १९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी आपल्या संस्थेस खालील अटींवर परवानगी देण्यात येत आहे :-

[अ] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक: टिइइ१-३३८२/१११८३६/[१९०]/तांशि-१[अ], दिनांक २१ मे, १९८३ अन्वये अशा संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस मान्य असतील[सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे].

[ब] सुरु करावयाचे पदवी अभ्यासक्रम तंत्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची मान्यता घेऊन निश्चित केले जातील.

[क] शिवाजी विद्यापीठ अधिनियम १९७४ कलम ४३ अन्वये सदर महाविद्यालयाचे शिवाजी विद्यापीठाशी संलग्नीकरण करण्यासाठी संस्थेने अर्ज केलेला असावा.

[ड] वरील [अ] व [ब] मध्ये अंतर्भूत असणारी कागदपत्रे व औपचारिक बाबी या संस्थेद्वारे तंत्र शिक्षण संचालकांच्या सहमतीने, समाधानकारकरित्या पूर्ण करण्यात येतील व त्या नंतरच अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अंतिम परवानगी व दिनांक तंत्र शिक्षण संचालक, मुं× महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून देण्यात येईल.

Recd on 7-7-84

....२...